OCTOBER, 2023 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE 1

DBJ NEWSLETTER

A Monthly Newsletter of D.B.J. College, Chiplun, Dist. Ratnagiri (M.S.)



IN THIS ISSUE

CULTURAL DEPT.
CAREER & PLACEMENT
ZOOLOGY DEPT.
GYMKHANA DEPT.
COMMERCE DEPT.
I.Q.A.C.
N.S.S.
MATHS. DEPT.
SUPERANNUATION

On the occasion of the first issue..

I am very happy to announce the launch of our inaugural college newsletter DBJ NEWSLETTER. This marks a significant step in our journey as an educational institute and I am very proud of the hard work and dedication that our teachers, staff and students put in making this newsletter a reality.

The DBJ NEWSLETTER will serve as a platform to celebrate our achievements, share insightful articles, highlight the talents of our students and faculty, and keep everyone informed about the latest happenings within our college.

It's an important document of our commitment and achievements to promote a sense of belonging and unity among our students, staff, and alumni. I would like to extend my gratitude to the dedicated team of writers, editors, and designers who have poured their passion into creating this newsletter.

I encourage all of you to actively participate with DBJ NEWSLETTER. Share your ideas, stories, and feedback with us. Let us use this platform to strengthen our connections, share our experiences and showcase the incredible talent that exists within our college.

I look forward to reading the first issue of the DBJ NEWSLETTER. I express my best wishes to many more editions of the DBJ NEWSLETTER in future.

Warm regards,

Dr. M.S. Bapat
Principal

OCTOBER, 2023 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE 1

Cultural Department



पुरुषोत्तम करंडक: वर्ष ५९, प्राथमिक फेरी-कोकण विभाग

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३ आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ८ अशा ११ एकांकिका कोकण विभागाअंतर्गत सादर करण्यात आल्या.

डीबीजे महाविद्यालयाचे यश

सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय - क्रांती कांबळे (SYBMS)
सर्वोच्च अभिनय नैपुण्य - क्रांती कांबळे (SYBMS)
सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम - हॅप्पी फादर्स डे

कलाकार:

Kranti Kamble - SYBMS
Chaitnya Devrukhkar - TY ZOO
Ankita Dingankar - SYBCom
Sanidhi Shetty - FY IT
Atharv Bhekare - SYBA
Siddhi Kambare - TYBA
Sanskar Lohar - FYBA
Sudesh - FYBCom

Team Manager: Prof. Prashant Chavan & Dr. Rahul Pawar

डी. बी. जे. मधील अभिनयाची क्रांती..!

by Dr. Rahul Pawar, Convner, Cultural Department

कालच्या पुरुषोत्तम करंडक 2023 च्या रत्नागिरी विभागातील प्रथम क्रमांकाची एकांकिका डी. बी. जे. महाविद्यालय चिपळूण ची "हॅप्पी फादर्स डे". On stage, Backstage, lights आणि लाईव्ह music अशा विविध पातळ्यांवर डी. बी. जे. च्या चमूने बहारदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.. पण या सगळ्यात विशेष भाव खावून गेली ती क्रांती कांबळे ही अभिनेत्री... पुरुषोत्तम करंडकस्पर्धेच्या बाबतीत एक अनोखी किमया ह्या विद्यार्थिनी ने करून दाखवली.

... स्पर्धेची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री हा खिताब तिने आपल्या अभिनयाच्या ताकदीने आपल्या नावावर केलाच पण त्याच बरोबर त्याच स्पर्धेचे वाचिक अभिनयाचं पारितोषिक सुद्धा मिळवलं.. कदाचित अशी किमया करणारी कोकण विभागातून ती पहिलीच अभिनेत्री / विद्यार्थिनी असावी...

पण क्रांती कांबळे च विशेष कौतुक या साठी की, घरची आर्थिक परिस्थिती बेताची, लहानपणी बाबांचं छत्र हरवलं आणि आईनं मोल मजुरी करून तिला लहानच मोठ केलं.. चांगले संस्कार केले.. या सगळ्यांची जाणीव ठेवून तिने अभ्यासात चांगली प्रगती करत महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागात सहभाग घेतला.. आणि कमी वयात परिस्थिनीने आलेली प्रगल्भता आणि समज यामुळे क्रांती आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये चमकू लागली... आणि तिच्या प्रयत्नांना सर्व प्रथम यश आल ते म्हणजे 2022 चा पुरुषोत्तम करंडक.. या स्पर्धेत तिला सर्वोत्कष्ट अभिनयाचं पारितोषिक मिळालं.. त्यांनतर लोकसत्ता लोकांकीका या स्पर्धेत देखील तिने सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून पुरस्कार मिळवला..पण घरच्या आर्थिक परिस्थितीमुळपरिस्थिती बेताची असली तरी हि-याची चमक झाकता येत नाही. सन २०२२-२३ यावर्षी पोस्टाने काढलेल्या भारती मध्ये क्रांती आपल्या गुणांच्या जोरावर भारतीय पोस्टात, पोस्ट मास्टर या पदावर नियुक्त झाली आणि ती देवरूख येथे पोस्टात नोकरीत रुजू झाली.. घर, नोकरी आणि शिक्षण या मुळे आता तिच्यातला कलाकार आता पुन्हा बघायला मिळणार नाही.. अशी खात्री तिच्यासह अनेकांना झाली होती..



पण ह्या वर्षी पुरुषोत्तम करंडक साठी फादर्स डे एकांकिका उतरविण्याचा निर्णय घेतला.. पण क्रांती च्या जागी आता कोण असा प्रश्न पडला.. तेव्हा एका फोनवर क्रांती ने सर मी 4 दिवसांची सुट्टी टाकते, आपण पुरुषोत्तम करूया..! हा शब्द दिला.. आणि स्पर्धेच्या 4 दिवस आधी क्रांती महाविद्यालयात तालमीला हजर..! रात्री 11.00 वाजेपर्यंत तालीम करून आपल्या टीम सोबत उभी राहिली, (याकालावधी न. को. एज्युकेशन सोसायटीने उपलब्ध करून दिलेल्या मुलींच्या हॉटेल मध्ये सरावानंतर आराम करत असे, न ए सोसायटी आणि रेक्टर कारंडे मॅडम याचे ती आणि सांस्कृतिक विभाग नेहमी आभारी आहोत) क्रांती ने आपल्या सहका-यांच्या संगतीने बहारदार कामगिरी करत एकांकिका स्पर्धा प्रथम क्रमांकाने जिंकलीच पण वैयक्तिक अभिनयाची सुद्धा 2 पारितोषिक आणली..!

पुरुषोत्तम एकांकिका स्पर्धेत सर्वोत्तम वाचिक अभिनय आणि सर्वोच्च अभिनय नैपुण्य असे दोन पुरस्कार एकाच कालाकाराला मिळण्याची घटना प्रथम घडत आहेत. आज दुसऱ्या दिवशी पुन्हा आपल्या पोस्टाच्या कामाला रुजू होण्यासाठी देवरुख येथे रवाना झाली आहे उद्यापासून कामावर रूजू होईल..!

Career Guidance & Placement Cell



डी.बी.जे. महाविद्यालयाच्या २२ विद्यार्थांची आय. सी. आय. सी.आय. बँकेत निवड : विद्यार्थ्यांना नेमणुकीचे निवडपत्र देताना बँकेचे अधिकारी आशिष राऊत व निरंजन मोहिते. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार श्री. संजीव खरे, प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. सुनिल भादुले, कॉमर्स विभाग प्रमुख सौ. खवणेकर मॅडम.



डी.बी.जे. महाविदयालय चिपळूण व आय. सी. आय. सी.आय. बँकेसोबत M.o.U. करताना नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार श्री. संजीव खरे, प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. सुनिल भादुले, कॉमर्स विभाग प्रमुख सौ. खवणेकर मॅडम .



DEPT. OF ZOOLOGY



डीबीजेत कोकणातील औषधी वनस्पती विषयावर ४ सप्टेंबरला विभागीय कार्यशाळा

चिपळूण : येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालयात डीबीजे महाविद्यालय आणि आर. पी. गोगटे महाविद्यालय,रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. कोंकणातील औषधी वनस्पती या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत वनस्पती तज्ज्ञ डॉ. शरद आपटे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

जैवविविधतेने समृद्ध असलेल्या कोकण विभागात अनेक महत्त्वपूर्ण आणि उपयोगी औषधी वनस्पती आढळून येतात. पूर्वापार येथील लोक या वनस्पतीचा विविध आजारांवर आयुर्वेदिक औषध म्हणून वापर करतात.आधुनिक जगात या औषधी वनस्पतींचा वापर सौंदर्यप्रसाधने सुगंधी द्रव्य व औषध म्हणून मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. यातील काही वनस्पती अतिशय दुर्मिळ आहेत. पश्चिम घाटातील अनेक मानवी उपक्रमामुळे त्या दुर्मिळ औषधी वनस्पतींना धोका निर्माण झाला आहे. या वाढत्या समस्येवर पर्याय म्हणून औषधी वनस्पतींचे संवर्धन व शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे गरजेचे आहे. हा एकमेव उद्देशाने डोळ्यासमोर ठेवून वनस्पती शास्त्रीय या विषयांचे विद्यार्थी शिक्षक व अभ्यासकांमध्ये दुर्मिळ औषधी वनस्पती विषयी जागृती निर्माण करणे हे अत्यंत आवश्यक आहे. यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ४ सप्टेंबर २०२३ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या जीवशास्त्र विभागामध्ये सकाळी १० वाजता सुरू होईल. डॉ. शरद आपटे यांचे व्याख्यान होईल व त्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरातील औषधी वनस्पतीचे निरीक्षण विद्यार्थ्यांनी करायचे आहे तसेच औषधी वनस्पतीचे प्रदर्शन देखील आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेचे समन्वयक प्रा. सुहास वाघमोडे, व्यवस्थापकीय सचिव प्रा. प्रेमकुमार शिवगण, विभाग प्रमुख डॉ. जी. बी. राजे, प्रा. डी. आर. पवार, हे विशेष परिश्रम घेत आहेत. या कार्यशाळेचा महाविद्यालयाच्या विद्यार्थी व शिक्षकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे चेअरमन प्रमोद तांबे, प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी केले आहे.

Regional Workshop on "Medicinal Plans in Konkan Region" held on 4th Sept.2023
Jointly organized by D.B.J.College, Chiplun & R.P. Gogate College, Ratnagiri.

In the workshop esteemed guest, Dr. Sharad Apate, Dr. Sonali Kadam and 8 student team members from R. P. Gogate College, Ratnagiri enlightened with their knowledge and presence. They delivered the lecture and also have exhibition of the 80 plus medicinal plants herbarium and specimens along with necessary scientific information.
In this workshop 58 students were participated along with teaching faculty more than 150 students visited to exhibition. Not only from our college but high school students from Chiplun and nearby vicinity also visited to exhibition.
Not only students but members of Global Tourism, (NGO) Chiplun, also participated namely (Samir Kovale, Aashutosh Govekar) and Ramshet Redij member, Governing Council Navkonkan Education Society, Chiplun also participated in workshop.
For successful completion of workshop heads of the various departments namely Prof. Dr. G.B. Raje, Prof. S. R. Bhadhule, Prof. D.R. Pawar & Prof. Agvekar contributed through their valuable guidance.









प्राणिशास्त्र, जीवशास्त्र व ड्राय लँड ऍग्रीकल्चर विभागाच्या वतीने कोकणातील औषधी वनस्पती ह्या विषयावर घेण्यात आलेल्या कार्यशाळेच्या उदघाट्न प्रसंगीचे तसेच मुख्यमार्गदर्शक प्रा. शरद आपटे, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख, गोगटे कॉलेज रत्नागिरी यांच्या व्याख्यानाचे आणि वनौषधी प्रदर्शनाचे काही फोटोरुपी क्षण...






PG. DEPT. OF ZOOLOGY

Research Activities

The activity of presentation of research work was organized by P.G. Department of Zoology on 17th August, 2023 in Research Centre of our college. Out of total 10 research students enrolled for Ph.D. in the subject of Zoology, 09 studetns presented their research work completed before 15th August, 2023.

Research students presented their research before Principal Dr. M.S. Bapat, Vice-Principal Dr. M.S.Chanda, Research Guides Prof. (Dr.) G.B.Raje and Dr. M. N. Jamble. The session was attended by several faculty including Mr. S. S. Waghmode, Dr. H. T. Babar, Dr. Samrat Mane, Dr. B.S.Kamble, Mrs. S.M.Mane, Mr. P.P. Chavan, Ms.P.R. Lakeshri etc.

Very brain storming discussion on research topic was done from 11.00 am to 5.30 pm. Through this activity, research students could boost their confidence and also could understood the lacunnae in their research. This session was helpful to strengthen the research activity in DBJ Campus.









SPORTS ACTIVITIES







दिनांक 5 व 6 सप्टेंबर 2023 रोजी झालेल्या मुंबई विद्यापीठ अंतर्गत कोकण झोन टेबल टेनिस स्पर्धेत डी.बी.जे. महाविद्यालयातील मुलींच्या संघास सांघिक प्रथम क्रमांक व मुलांच्या संघास सांघिक द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

दिनांक 8 व 9 सप्टेंबर 2023 रोजी डी.जे. रुपारेल कॉलेज, माटुंगा येथे होणाऱ्या इंटर झोन स्पर्धेकरिता कोकण झोनच्या मुलींच्या संघामधून कु. साक्षी प्रबळकर व कु. शर्वरी पाटणकर यांची निवड झाली आहे. तसेच मुलांमधून दिलीप शर्मा याची निवड झाली आहे.



कु. साक्षी पवार (TYBA)

एसीएस कॉलेज लांजा येथे पार पडलेल्या इंटर झोन क्रॉस कंट्री स्पर्धेत ऑल इंडिया क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड.



कु. आर्या तांबे (C.S. Dept.)

कोकण झोन विभाग ४ च्या योग स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक तसेच कोकण झोनकडून दि. ६ ऑक्टोबर रोजी बी.के. बिर्ला कॉलेज, कल्याण येथे होणा-या मुंबई विद्यापीठ योग स्पर्धेसाठी निवड.

SPORTS ACTIVITIES





KONKAN Zone received Bronze Medal in Inter-Zonal Squash Tournament of Unversity of Mumbai 2023-2024









दिनांक 12 व 13 सप्टेंबर 2023 रोजी कोकण झोन SQUASH स्पर्धेत आपल्या महाविद्यालयास मुलांच्या संघास सांघिक सुवर्णपदक मिळाले व मुलांच्या संघामधून कु. अनिश शिंदे S.Y.B.Sc. IT, कु. प्रवीण चव्हाण S.Y.B.Sc. IT कु साईप्रसाद राजपूत SY.B.Sc. IT तसेच कु यश बामणे S.Y.B.Sc. IT या चौघांचे दिनांक 15 व 16 सप्टेंबर 2023 रोजी डोंबिवली येथे होणाऱ्या इंटर झोन SQUASH स्पर्धेकरिता कोकण झोन संघामध्ये निवड.

मुलींच्या संघास सांघिक तृतीय क्रमांक मिळाले व मुलींच्या संघामधून कुमारी शर्वरी पाटणकर TY. B.COM कुमारी दिया भाटिया TY.B.COM कुमारी सरिता बावदाने SY.BSC IT यांची दि. 15 व 16 सप्टेंबर 2023 रोजी डोंबिवली येथे होणाऱ्या इंटर झोन SQUASH स्पर्धेकरिता कोकण झोन संघामध्ये निवड.

SASKRIT DEPT.

सस्नेहं निमन्त्रणम्

संस्कृतभारती, कोङ्कणप्रान्तः तथा,

डी. बी. जे. महाविद्यालयः, चिपळूणम्

एताभ्याम् आयोजितः

संस्कृतदिनकार्यक्रमः

सादरः प्रणामः।

डी. बी. जे. महाविद्यालये संस्कृतभारतीसंस्थायाः सहयोगेन संस्कृतदिनकार्यक्रमः कनिष्ठमहाविद्यालयस्य वाङ्मयमण्डलम्, संस्कृतविभागः, भाषा-अध्ययन-केन्द्रम्, आविष्कारविभागः च एतैः आयोजितः अस्ति।
भवताम् उपस्थितिः समित्रपरिवारं साग्रहं प्रार्थनीया!

दिनांकः - ०४ सप्टेंबर २०२३
समयः - ११ : ४५ वादने
स्थलम् - सेमिनार हॉल

डॉ. माधवी जोशी
संस्कृत-विभाग प्रमुखा

YOUTH FESTIVAL



Youth Festival 2023
Final Round
SKIT -A (Marathi)
Yanda Kartvya ahe
Gold Medal


Artist
Sansakar lohar FYBA
Atharv bhekare SYBA
Paras Shiigwan FYBCom
Atish tambe FYBA
Siddhant natekar FYBA
Chaitanya Devrukhkar TYZoo




Accompanist
Sujal Lohar TY geography
Vinayak shirke FYBSc
Sumit chile TYBA HIS


Team Manager
Prof. Mugdha Padhye (Psychology Dept)
Prof. Asmita Joshi (Economic development)

Director - Ex Students
Mr. Mahesh Gurav and Mr. Mahesh Kaparekar



कु. सिद्दी कांबरे (FYBA)
युथ फेस्टिवल २०२३
अंतिम फेरी
एकपात्री अभिनय (हिंदी)
उत्तेजनार्थ





कु. प्रियांका शिगवण (FYBA)
युथ फेस्टिवल २०२३
रांगोळी स्पर्धा
रौप्य पदक

YOUTH FESTIVAL





Youth Festival 2023
Final Round

Group Event - Mime मुकाभिनय: DBJ College Won Silver Medal

Artists :
Chaitanya Devrukhkar - TYZoo, Atharv Bhekare - SYBA, Sanskar Lohar - FYBA, Sushil Kamble - SY-IT, Rushikesh Salav - TY-CS, Atish Tambe - FYBA

Director
Ex Students of DBJ, Mr Mahesh Gurav, Mr. Mahesh Kaparekar and Mr. Ashu Pawar

Team Manager - Prof. Prashant Chavan (Dept of Zoology)

YOUTH FESTIVAL

युवा महोत्सव २०२३

अंतिम फेरीत डी.बी.जे. महाविद्यालयाची 'बंद आहे' ही एकांकिका सादर झाली होती.

या एकांकिकेतील **कु. संस्कार लोहार (F.Y.B.A.)** याला 'बाबा' या भूमिकेसाठी **'सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनेता - उत्तेजनार्थ'**

तर

कु. तन्वी खेतले (S.Y.B.Com.) हिला 'आई' या भूमिकेसाठी **सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनेत्री - उत्तेजनार्थ**

अशी दोन पारितोषिके प्राप्त झाली...

ब-याच वर्षांच्या मध्यांतरानंतर मराठी एकांकिका या कला प्रकारात डी.बी.जे. च्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करण्यात यश आले....

दिग्दर्शक - डी.बी.जे. चा माजी विद्यार्थी - श्री संकेत हळदे

संघ व्यवस्थापक - प्रा. प्रशांत चव्हाण - प्राणीशास्त्र विभाग

DEPT. OF COMMERCE



Department of Commerce and Consumer Guidance Society of India and BSE jointly organised a seminar on **"How to Manage Money and Be a Smart Investor"** on 12/09/2023.
Total 3 sessions were held.



Department of Commerce conducted valedictory ceremony of **Certificate Course in Income Tax and GST** 30hrs course on 12/09/2023.
Total 59 students successfully completed course.
Principal DR. M.S. Bapat congratulated all the participants.



Department of N.E.P.-2020 conducted a workshop on "**Understanding of NEP, 2020**" on 26/09/2023.
Prof. Mrs. R.P. Khavanekar was the chief Resource Person for the workshop.
All the teachers were present for this workshop.

Internal Quality Assurance Cell (IQAC)







डी.बी.जे.त वैद्यकीय तपासणी शिबिर

डी.बी.जे. महाविद्यालयाच्या आय. क्यू.ए. सी. या विभागातर्फे महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी माधवबाग व अपरांत हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या प्रारंभी प्रा. सुनील भादुले यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी मनोगत व्यक्त करून आरोग्याचे महत्त्व स्पष्ट केले. या शिबिरात अपरांत हॉस्पिटलचे डॉ. भास्करकर, डॉ. भक्ती पालांडे, तर माधवबाग यांचे डॉ. राधा मोरे, डॉ. स्नेहल नांगरे यांनी मार्गदर्शन व तपासणी केली. याच बरोबर श्री. राकेश कदम, श्री. जवाहर चंदनशिवे, मानसी संकपाळ, सुरज पेवेकर, प्रगती निवाते, शेखर भुवड यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिरात प्रामुख्याने इसीजी, रक्तातील साखर, फोन डेन्सिटीमेट्री चेकअप करण्यात आले.

सदर शिबिरात ९५ शिक्षक- शिक्षकेतर, कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला. या शिबिराला कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. तळपसर, पर्यवेक्षिका सौ. स्नेहल कुलकर्णी यांनी भेट दिली. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी आय. क्यू .ए. सी. विभागाचे प्रा. उदय बामणे आणि त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

OCTOBER, 2023 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE. 1

N.S.S.

रक्तदान शिबीर







दिनांक 28 सप्टेंबर 2023 रोजी डी. बी. जे. महाविद्यालयामधील आय. क्यू. ए.सी. विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग, सांस्कृतिक विभाग, जिमखाना विभाग, जनकल्याण रक्तपेढी महाड यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एस. बापट, उपप्राचार्य डॉ. एम. एस. चांदा, आय.क्यू.ए.सी समन्वयक प्रा. उदय बामणे, जिमखाना विभाग प्रमुख प्रा.आर. एम. मोरे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग समन्वयक डॉ. यु.डी. सूर्यवंशी, कार्यक्रम अधिकारी सौ. अर्चना कांबळी, सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रा. अशितोष मोडक, डब्ल्यू.डी. सी. समन्वयक प्रा. सौ. प्रिया काटदरे, तसेच प्रा. डॉ. ऋचा खवणेकर, प्रा. चैतन खांडेकर, प्रा. माधव ओक, प्रा.आर.के. दवणे, प्रा. गौतम ब्रम्हे, प्रा. सौ अस्मिता जोशी, प्रा. सौ. नेहा तांबे हे उपस्थित होते.

जनकल्याण रक्तपेढी महाड मधील रविकांत शिंदे (PRO) आकेश भिडे (MSW), डॉ. ईशा भुस्कुटे, भ्रांती खोपकर (Technical Manger) रोशन जाधव, भाविका पांडे (Technician), सरस्वती पाटोळे (Nurse) दीपा शिर्के (मदतनीस) यांनी हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यामध्ये मोलाचे सहकार्य दिले.

यावेळी या रक्तदान शिबिरामध्ये 33 रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच 73 विद्यार्थ्यांचे हिमोग्लोबिन आणि रक्तगट तपासणी करण्यात आली.

OCTOBER, 2023 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE. 1

N.S.S.

पथनाट्य सादरीकरण







राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग आणि चिपळूण पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने चिपळूणमध्ये आम्ली पदार्थ विरोध जनजागृती करत गोवळकोट चौक, चिंचनाका आणि मध्यवर्ती बस स्टॅण्ड,चिपळूण अशा विविध ठिकाणी 'लथ को लाथ' हे पथनाट्य सारद केले. या प्रसंगी श्री. राजेंद्र सिंग रादमाने, उप विभागीय पोलीस अधिकारी, चिपळूण, पंकज खोपरे, पोलीस उपनिरिक्षक, चिपळूण, आरती चव्हाण, महिला पोलीस हवालदार, चिपळूण, दिलीप जाणकार, पोलीस कॉन्टेबल, चिपळूण उपस्थित होते.

Dept. of Mathematics


Department of Mathematics organised one day workshop on " Problem Solving Strategies " on 30th September 2023.

Dr. V. V. Acharya, Department of Mathematics, Fergusson College, Pune was the resource person for the workshop.

Various problems solving techniques were discussed in the workshop.

Students of F.Y, S.Y. ,T.Y.B. Sc.(Mathematics) and faculty members from D. B. J. College, Khare-Dhere-Bhosale College, Guhagar, ICS College, Khed and Mandar College, Pedhambe attended the workshop.

Total 35 students and 8 teachers were present for the workshop.







OCTOBER, 2023 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE. 1

SUPERANNUATION

Dr. G.L. Thakur (H.O.D. -Dept. of Hindi)

Date: 31/09/2023









MY DEAR D.B.J. FAMILY AND N.E. SOCIETY,

आपण केलेल्या माझ्या या भावपूर्ण निरोप सत्काराबद्दल मी आपले मनापासुन आभार व्यक्त करतो.

३३ वर्षे आपणासोबत घालविलेला काळ विसरता येणे शक्य नाही. 'जन्मभूमी' कुठे आणि 'कर्मभूमी' कुठे ! 'एकविरा देवी' अमरावती आणि 'परशुराम भूमि' चिपळूण...हा दैवी संयोग कदाचित माझ्यासाठीच घडवून आणला असेल. मी आपले कर्तव्य ईमानदारीने बजावले आहे. यात सुख-दुःखात आपण माझी साथ दिली आहे. जर कळत-नकळत माझ्या हातुन काही चुक झाली असल्यास कृपया क्षमा करणे.

आपल्या शुभेच्छा,आशीर्वाद व प्रेम सदैव माझ्या पाठीशी आहेत.

आपले हे ऋणानुबंध असेच कायम असु दे !

आपलाच

डॉ.जी.एल.ठाकुर

